www.rajdand.com
सातारा, शुक्रवार
12.01.2024
पृष्ठ : ४ । मुल्य : ४ । मार्गशीर्ष कृ.२७
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९

२५ वर्षे विश्वासार्हतेची

## देशातील सर्वाधिक लांबीचा सागरी पूल

# 'अटल सेतू'चे आज पंतप्रधान मोदींच्या हस्ते उद्घाटन

**मुंबई:'अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतू'चे आज, शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन होत आहे. पंतप्रधान यावेळी स्वत: सेतूवरून प्रवास करीत रायगड जिल्ह्यात व नवी मुंबई विमानतळ परिसरात पोहोचणार आहेत.**



मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) १७ हजार कोटी रुपये खर्चून या जवळपास २२ किमी लांबीच्या सेतूची उभारणी केली आहे. त्यातील १६ किमीचा भाग समुद्रावर असून देशातील सर्वाधिक लांबीचा सागरी पूल ठरला आहे.

या सेतूसह अन्य काही प्रकल्पांचे उद्घाटन व भूमिपुजन करण्यासाठी पंतप्रधान मोदी हे आज, शुक्रवारी दुपारी विमानाने छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरून तिथून हवाई दलाच्या विशेष हेलिकॉप्टरने नौदलाच्या कुलाब्यातील हवाईतळावर येतील. त्यानंतर रस्त्याने शिवडी येथे पोहोचून 'अटल सेतू'चे उद्घाटन करतील. यानंतर त्यांचा ताफा सेतूवरून प्रवास करीत चिर्ले येथे उतरेल व पुढे बांधकामाधीन असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या परिसरात ते पोहोचतील. जवळपास ३० ते ४० मिनिटांचा तेथे कार्यक्रम होईल. त्यानंतर पंतप्रधान हेलिकॉप्टरने विमानतळाकडे जाऊन पुढील प्रवासाला निघणार आहेत.

## ससूनमध्ये वैद्यकीय चाचणीसाठी आणलेल्या आरोपीचा धिंगाणा

### रुग्णालयाची तोडफोड, कर्मचाऱ्यांना शिवीगाळ




पुणे: पुण्यातील ससून रुग्णालयात एक धक्कादायक घटना घडली आहे. वैद्यकीय चाचणीसाठी आणलेल्या आरोपीने रुग्णालयात तोडफोड केली आहे. ससून रुग्णालयातील या तोडफोडीचा व्हिडिओ समोर आला आहे. पोलिसांनी आरोपीला वैद्यकिय चाचणीसाठी ससूनमध्ये आणले असताना त्याने रुग्णालयात धिंगाणा घातला आहे.


मिळालेल्या माहितीनुसार, रोहित गुप्ता असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी त्याला वैद्यकिय चाचणीसाठी ससूनमध्ये आणले होते. यावेळी त्याने रुग्णालयात धिंगाणा घातला आहे. तसेच रुग्णालयात तोडफोड केली आहे. कर्मचाऱ्यांना शिवीगाळ केला आहे. आरोपीला पकडण्यात सुरक्षारक्षकांना यश आले आहे. या घटनेचा एक व्हिडिओ समोर आला आहे.

## तलावात बुडून दोन सख्ख्या भावांसह चार चिमुकल्यांचा मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर :** वाळूज महानगर येथील बनकरवाडी येथील बारा ते चौदा वर्षे वयाच्या चार मुलांचा तलावात बुडून मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी (११ जानेवारी) संध्याकाळी सातच्या सुमारास घडली. विश्वजितकुमार सुखदेव उपाध्याय (वय १२ वर्षे), अबरार जावेद शेख (वय १२ वर्षे), अफरोज जावेद शेख (वय १४ वर्षे), कुणाल अनिल दळवी (वय १३ वर्षे, चौघे रा. रांजणगाव शेणपुंजी, ता. गंगापूर) अशी बुडून मृत्यू झालेल्या मुलांची नावे आहेत. या घटनेनंतर परिसरात नागरिकांनी हळहळ व्यक्त केली आहे.



विश्वजित उपाध्याय



कुणाल दळवी



अबरार शेख



अफरोज शेख

पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, रांजणगाव शेणपुंजी येथील दत्तनगरात राहणारे विश्वजितकुमार, अबरार, अफरोज, कुणाल हे चौघे गुरुवारी दुपारी येथील पाझर तलावात पोहण्यासाठी गेले होते. मात्र, संध्याकाळ झाली तरी मुले घरी परतली नसल्याने त्यांच्या पालकांनी परिसरात त्यांच्याबाबत विचारपूस सुरू केली. या वेळी ही मुले पाझर तलावाकडे गेली असल्याची माहिती मिळाली मिळाली. त्या वेळी त्यांच्या पालकांनी तेथे जाऊन पहिले असता तलावाच्या काठावर कपडे व मोबाइल दिसून आले. या वेळी त्यांचा शोध घेतला असता ते दिसून आले नाहीत. पाण्याचा अंदाज न आल्याने चौघांचाही पाण्यात बुडून मृत्यू झाला असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

मुलांचा शोध

घटनेची माहिती मिळाल्यावर प्रभाकर महालकर, दीपक बडे, दत्तू हिवाळे, जावेद शेख, साईनाथ जाधव व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी मुलांचा शोध घेतला; तसेच याची माहिती वाळूज अग्निशमन दलाला दिली असता पी. के. चौधरी, के. टी. सूर्यवंशी, एन. एस. कुमावत, पी. के. हजारे, एस. बी. महाले, वाय. डी. काळे, एस. बी. शेंडगे आर्दीनी नागरिकांच्या मदतीने चारही मुलांचे मृतदेह पाण्यातून बाहेर काढले. याची माहिती मिळाल्यावर वाळूज ह्यएमआयडीसीह्न ठाण्याचे पोलिस निरीक्षक अविनाश आघाव, निरीक्षक गणेश ताठे, उपनिरीक्षक पुंडलिक डाके, अंमलदार योगेश शेळके आर्दीनी पाण्यातून काढलेले मुलांचे मृतदेह रुग्णवाहिकेतून घाटी रुग्णालयात दाखल केले; तसेच घटनेची माहिती मिळाल्यावर पोलिस उपायुक्त नितीन बगाटे, सहायक पोलिस आयुक्त महेंद्र देशमुख गंगापूरचे तहसीलदार सतीश सोनी आर्दीनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

**मृतांमध्ये सख्खे भाऊ**

अबरार शेख व अफरोज शेख हे दोघे सख्खे भाऊ असून मुलांचा बुडून मृत्यू झाल्याचे समजल्यावर नातेवाइकांनी टाहो फोडला, तर या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. घटनास्थळी आणि गावात शोककळा पसरली होती.

## आधी पत्नी आणि मुलाची हत्या साथीदारांसह ६८२ गुंतवणूकदारांना कोटींचा गंडा

**कल्याण:** मुलासह पत्नीची हत्या करणारा क्रूरकर्मा दीपक गायकवाड याने केलेल्या त्याच्या कुकर्मकांडात आणखी दोघांचा समावेश असल्याचे पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्ह्यातून उघडकीस आले आहे. आरोपी दीपक आणि त्याच्या दोघा साथीदारांनी मिळून सुरू केलेल्या दोन कथित कंपन्यांच्या माध्यमातून ६८२ गुंतवणूकदारांना ३१ कोटी ६८ लाख ५४ हजार ५०० रूपयांचा चूना लावला आहे. या संदर्भात स्थानिक महात्मा फुले चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कल्याण पश्चिमेतील छत्रपती शिवाजी महाराज चौकात असलेल्या जिवशी अपाटमेंटमध्ये तिसऱ्या आणि चौथ्या मजल्यावर सन २०१८ सालात निधी रिसर्च फर्म आणि आकाश टूर्स अँड ट्रॅव्हल्स अशा दोन कंपन्यांची आलिशान कार्यालये थाटण्यात आली. कल्याण पश्चिमेकडील संतोषी माता रोडला असलेल्या रामबाग लेन ३ येथील ओम दिपालया सोसायटीतील तिसऱ्या मजल्यावर राहणारा दीपक अशोक गायकवाड (४५) याने त्याच्या आकाश सुरवाडे आणि दर्शन बागुल या दोघांच्या मदतीने ही कार्यालये थाटली होती. अर्थविषयक ज्ञान असल्याने या उद्योगासाठी निधी रिसर्च फर्म नावाची गुंतवणूक कंपनी स्थापन करून गुंतवणूकदारांना वाढीव व्याजाचे आमिष दाखवून दीपक या कंपनीत गुंतवणूक करत होता.

आकाश सुरवाडे आणि दर्शन बागुल हे दोघे त्याच्या कथित कंपन्यांमध्ये भागीदार होते. शुक्रवारी १ डिसेंबर रोजी दुपारच्या सुमारास दीपक गायकवाड याने अश्विनी (३२) आणि तिचा मुलगा अधिराज (७) या दोघा माय-लेकाला ठार मारून पळ काढला. महात्मा फुले चौक पोलिसांनी माग काढत या क्रूरकर्म्याला संभाजीनगरमधून दुसऱ्या दिवशी पहाटेच्या सुमारास जेरबंद केले. या हत्याकांडामागे खूनी दीपकच्या कार्यालयात काम करणारी महिला देखील कारणीभूत असल्याचे मृत अश्विनीचा भाऊ विकेश मोरे याने पोलिसांना दिलेल्या जबानीतून उघड झाले. कार्यालयातील महिलेशी असलेले अनैतिक संबंध आणि कजर्बाजारीपणाला कंटाळून दीपक गायकवाड याने पत्नीसह मुलाची हत्या केल्याचे समोर आले.

अश्विनीचा भाऊ विकेश याने त्या महिलेचे नाव देखील सांगितले. मात्र या महिलेवर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले. आता याच खुनाचा बडा कारनामा पोलिसांनी नव्याने पटलावर आणला आहे. ६८२ गुंतवणूकदारांच्या वतीने बेतुरकर पाड्यातील दत्ता कॉलनीत राहणाऱ्या हर्षदा बाळकृष्ण गंभिरराव (३४) या नोकरदार महिलेने दीपक गायकवाड याचा भांडाफोड केला आहे. माझ्यासह अन्य ३८२ गुंतवणूकदारांना आकर्षक परताव्याचे अमिष दाखवून टप्प्याटप्प्याने ३१ कोटी ६८ लाख ५४ हजार ५०० रूपये उकळले. मात्र परतावा अथवा गुंतवणूक केलेली रक्कम परत न देता साऱ्या पैशांचा अपहार केला असल्याचा आरोप हर्षदा गंभिरराव यांनी त्यांच्या फिर्यादीत केला आहे.

## औषध विक्रीच्या दुकान मालकांची कोर्टात धाव

**मुंबई:** मुंबईतील औषध विक्रीच्या तीन दुकानांविरोधात अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दहा दिवसांच्या परवाना निलंबनाचा आदेश काढल्यानंतर त्याविरोधात अपिल करूनही दोन महिन्यांहून अधिक काळापासून या विभागाचे मंत्री धमरीवबाबा अत्राम यांनी सुनावणीच घेतली नसल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. तसेच मंत्री अत्राम यांना लवकरात लवकर सुनावणी घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्याचबरोबर तोपर्यंत या तिन्ही दुकानांवर कारवाई करू नये, असेही आदेशात स्पष्ट केले आहे.



मेसर्स अपना केमिस्ट, श्री महावीर केमिस्ट व मेसर्स अपना मेडिकल एलएलपी या तीन दुकानांच्या मालकांनी परवाना निलंबनाचा आदेश लागू होणार असतानाच्या अखेरच्या क्षणी ॲड. अटलबिहारी दुबे, ॲड. अरविंद तिवारी व ॲड. राहुल मिश्रा यांच्यामार्फत रिट याचिकांद्वारे आपली कैफियत न्यायालयासमोर मांडली. आकस्मिक तपासणीच्या वेळी औषध दुकानाची परवानाधारक व्यक्ती दुकानात उपस्थित नव्हती. तसेच औषधे व सौंदर्य प्रसाधने नियमांतील तरतुदींचे उल्लंघन करत काम सुरू आहे, अशा कारणाखाली अधिकाऱ्यांनी आम्हाला ११ ऑगस्ट २०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावली.


त्याबाबत आम्ही १४ ऑगस्ट व ११ सप्टेंबर २०२३ रोजी सर्व आक्षेपांना सविस्तर उत्तर दिले. तरीही त्याचा साकल्याने विचार न करता विभागाने ३ ऑक्टोबर २०२३ रोजी कारवाईचा आदेश काढून आमचा परवाना ८ जानेवारी ते १७ जानेवारी २०२४ या दहा दिवसांच्या कालावधीसाठी निलंबित केला. ही कारवाई चुकीची असल्याने आम्ही ३१ ऑक्टोबर २०२३ रोजी अर्धन्यायिक अधिकार असलेले अपिलीय प्राधिकरण म्हणून मंत्र्यांकडे अपिल केले. त्यानंतर लवकरात लवकर सुनावणी होण्याकरिता मंत्र्यांना निवेदन देण्याचा अनेकदा प्रयत्न केला. कारण आदेशाची अंमलबजावणी होऊन आमच्या व्यवसायाच्या हक्कांवर गदा येण्याची स्थिती निर्माण झाली होती. तरीही सुनावणी झाली नसल्याने नाईलाजाने न्यायालयात यावे लागले, अशी कैफियत अपना केमिस्टच्या मालकांनी मांडली. अशाच प्रकारची कैफियत अन्य दोन दुकानांच्या मालकांनीही मांडली. त्याची न्या. गिरीश कुलकणी व न्या. फिरदोश पूनीवाला यांच्या खंडपीठाने गंभीर दखल घेतली. ह्यकारवाईच्या आदेशाची अंमलबजावणी होऊन आमच्या परवाना निलंबनाचा कालावधीही संपल्यानंतर आमच्या अपिलावर सुनावणी होऊन तो पर्याय व्यर्थ ठरू नये. अपिलावर आमच्या बाजूने निर्णय झाल्यास आमचे मोठे नुकसान होईल, हे याचिकाकर्त्यांचे म्हणणे रास्त आहे. शस्त्रक्रिया यशस्वी, पण रुग्णाचा मृत्यू... अशा स्वरुपाची स्थिती निर्माण होण्यासाठी वाव असता कामा नये. कारण मुदतीत सुनावणी न झाल्यास व्यावसायिकांच्या व्यवसाय करण्याच्या मूलभूत हक्कांवरच गदा येते, असे निरीक्षण खंडपीठाने आपल्या निणर्यात नोंदवले.

## पुणे-लोणावळा दरम्यान सोमवारपासून दुपारच्या वेळेत लोकल धावणार

### रेल्वे बोर्डाचा निर्णय; खासदार श्रीरंग बारणे यांची माहिती

**सतिश गाडे**

**वडगाव मावळ :** लोणावळा ते पुणे दरम्यान आता दुपारच्या वेळेतही लोकल धावण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सोमवार (दि.१५) पासून दुपारच्या वेळेत सोईनुसार लोकल धावणार आहे. याबाबतचा निर्णय बोर्डाने घेतला आहे. बोर्डाने ही माहिती खासदार श्रीरंग बारणे यांना दिली. रेल्वे सुरू होणार असल्याने प्रवासी, विद्यार्थी, चाकरमानी, नोकरदार, पर्यटक यांची मोठी सोय होणार आहे.



कोरोना साथ सुरु होण्यापूवी पुणे-लोणावळा दरम्यान लोकल गाड्यांचे संचालन व्यवस्थित सुरु होते. कोरोना साथीच्या कालावधीत रेल्वेची सेवाच बंद करण्यात आली. कोरोनानंतर आता देशात पूवीप्रमाणे सर्व रेल्वे सुरु झाल्या आहेत. कोरोना साथीच्या अगोदर पुणे-लोणावळा दरम्यान सकाळी साडे अकरा ते दुपारी अडीच वाजताच्या कालावधीत दोन लोकल गाड्या चालवल्या जात होत्या.

त्या गाड्यांचे संचालन बंद होते.साडे दहा ते अडीच या वेळेत लोकल सेवा बंद होती. दुपारच्या वेळेत रेल्वे सुरू करण्याची मागणी खासदार बारणे यांनी संसदेत, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्याकडे सातत्याने केली होती. अखेरिस खासदार बारणे यांच्या सततच्या पाठपुराव्याला यश आले आहे.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले की, लोणावळा ते पुणे दरम्यान सोमवारपासून लोकल सुरू करण्याचा निर्णय रेल्वे बोर्डाने घेतला आहे. यामुळे प्रवासी, विद्यार्थी, चाकरमानी, नोकरदार, पर्यटक यांची मोठी सोय होणार आहे. दुपारच्या वेळेत सुरू होणे हे सर्वांचे यश आहे.

## वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांविरोधात उपोषण

**सतिश गाडे**

**वडगाव मावळ :** महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे पुणे ग्रामीण अधीक्षक अभियंता मनोज जरग यांच्या विरोधात तीन सामाजिक कार्यकर्त्यांनी लक्षणिक उपोषण केले. केलेल्या तक्रारीची दखल न घेतल्यास बेमुदत उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.




मावळ पंचायत समिती चौकात उपोषणास सामाजिक कार्यकर्ते देविदास ज्ञानेश्वर जाधव,वीज वितरण कंपनीचे माजी सदस्य सुनील तावरे व नितीन जांभळे हे तीन सामाजिक कार्यकर्ते सहभागी झाले होते. अधिक्षक अभियंता युवराज जरग यांनी मागण्यांची त्वरित दखल न घेतल्यास २५ जानेवारी पासून बेमुदत उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. सोमाटणे फाटा येथील सहायक अभियंत्यांनी माझ्या विरोधात वडगाव पोलिस ठाण्यात खोटी तक्रार दिल्याने मनस्ताप व शारीरिक त्रास झाला. त्यामुळे या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी उपोषणकर्ते जाधव यांची मागणी आहे.

**राष्ट्रवादी काँग्रेसचा उपोषणाला पाठिंबा**

राष्ट्रवादी काँग्रेसचे ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष अतुल राऊत मावळ तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक अध्यक्ष विशाल वाहिले, किरण भिलारे, शिवसेनेचे नेते बाळासाहेब शिंदे आदी उपोषणाला भेट देऊन पाठींबा दिला

# निकाल लागला; न्याय?

सभापती, राज्यपाल, राष्ट्रपती पदांवरील व्यक्ती अ-राजकीय असतात, निवडणूक आयोग तटस्थ असतो वगैरे तत्त्वज्ञान हे शालेय पाठयपुस्तकांच्या पहिल्या पानावरील प्रतिज्ञेइतकेच सत्य असते हे भान समस्त भारतवर्षांस येऊन बराच काळ लोटला. त्यामुळे महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष रा. रा. राहुल नार्वेकर यांनी शिवसेना फुटीसंदर्भात दिलेल्या निणर्याने कोणालाही धक्का बसणे संभवत नाही. हा, असाच आणि इतकाच निर्णय याप्रकरणी अपेक्षित होता आणि तो तसाच आणि तितकाच आला, यात आश्चर्य अजिबात नाही. प्रचलित राजकारणाकडे डोळे उघडे ठेवून आणि डोके कोणा चरणी न ठेवता जे कोणी पाहात असतील त्या सर्वास या निणर्यामागील अपरिहायर्ता लक्षात येईल. त्यासाठी सभाध्यक्ष नार्वेकर यांचा शिवसेना ते भाजप व्हाया राष्ट्रवादी काँग्रेस हा प्रवास आठवण्याची मुळीच गरज नाही. भाजपचे सुदृढ आणि सक्षम राजकीय नेतृत्व जितक्या स्वतंत्र बुद्धीचा सभापती सहन करू शकेल तितके स्वतंत्र विचारांचे श्री. नार्वेकर निश्चितच आहेत. ते स्वतः वकील. त्यामुळे त्यांस कायद्याचेही ज्ञान. शिवाय मार्गदशर्नास दिल्लीहून भाजपच्या पदरी असलेली अत्यंत तगडी फौज. त्यामुळे असा निर्णय घेताना जे काही बौद्धिक, वैधानिक आणि सांसदीय चापल्य दाखवावे लागते ते प्रदर्शित करणे वकिली पाश्वर्भूमी आणि बहुपक्षीय अनुभव यामुळे नार्वेकरांस अधिक सुलभ गेले असणार. याप्रकरणी सभापतींस सर्वोच्च न्यायालयाच्या दट्टयामुळे निर्णय घ्यावा लागला, असे म्हणणेही योग्य ठरणार नाही. याचे कारण सदरहू प्रकरणात जितकी दिरंगाई करणे नव्या सरकारच्या स्थैर्यासाठी आवश्यक होते तितकी दिरंगाई नार्वेकर यांनी दाखवलेली होती. आता संसदेच्या निवडणुका हाकेच्या अंतरावर आहेत आणि त्या पाठून राज्य विधानसभा निवडणुकांची चाहूल लागणार आहे. असे असताना हा निकाल अधिक लांबवण्याची तशीही गरज नव्हती. राजकीय ईप्सित साध्य झालेलेच होते. तेव्हा सर्वोच्च न्यायालय हे केवळ निमित्त. ते सभापतींनी साधले आणि या प्रकरणाचा एकदाचा ह्यनिकाल लावलाह्ण. आता या निकालाविषयी. विधानसभाध्यक्षांच्या सांसदीय कौशल्याचा अजिबात अनादर न करता त्यांनी दिलेल्या निकालाविषयी तीन प्रमुख मुद्दे नोंदवणे-अर्थातच नम्रपणे-गरजेचे ठरते.



या निकालाविषयी जे काही माध्यमांतून प्रस्तुत झाले त्यावरून असे दिसते की एकनाथ शिंदे यांच्याकडे पक्षत्यागप्रसंगी बहुमत होते, असे काहीसे मत सभाध्यक्ष व्यक्त करतात. या संदर्भात महत्त्वाचा मुद्दा असा की पक्षत्याग वा फूट ही एकवेळची घटना असते. ती सतत चालणारी प्रक्रिया नाही. म्हणजे जेव्हा फूट पडते त्या वेळी फुटलेल्या नेत्याकडे बहुमत होते किंवा काय याची खातरजमा व्हायला हवी. राजकीय सोयीमुळे असे बहुमत नंतर ह्यतयारह्ण कसे करता येते हे या देशाने अनेकदा अनुभवलेले आहे. तेव्हा या प्रकरणात शिंदे यांनी पक्ष सोडला त्या वेळी त्यांच्याकडे शिवसेनेच्या त्या वेळच्या ५५ आमदारांपैकी किती जण होते? उपलब्ध माहितीवरून दिसते ते असे की शिंदे यांच्याकडे त्या वेळी असलेल्या आमदारांची संख्या १६ इतकीच होती. तेव्हा ५५ मध्ये १६ हे बहुमत ठरते काय? तसेच, गेल्या वर्षीच्या आदेशात सर्वोच्च न्यायालयाने पक्षाची यंत्रणा आणि पक्षाची विधिमंडळ शाखा या बाबतही सविस्तर, सुस्पष्ट विवेचन केले होते. त्यानुसार विधिमंडळात पक्षनेता नेमण्याचा अधिकार हा पक्षालाच असतो हे आणि पक्षाची विधिमंडळ शाखा पक्ष यंत्रणेशिवाय स्वतंत्रपणे उभी राहू शकत नाही, असेही त्यातून स्पष्ट झाले होते. पक्षाच्या विधिमंडळ शाखेस हवे ते करण्याचा अधिकार दिला गेला तर ही शाखा मूळ पक्षापासून स्वतंत्रपणे वागू लागेल, हे योग्य नाही, असे सर्वोच्च न्यायालयाचे मत. याचाच अर्थ विधिमंडळात पक्ष प्रतोद नेमण्याचा अधिकार हा पक्षप्रमुखास- या प्रकरणी उद्धव ठाकरे यांस- आहे, विधिमंडळ पक्षास नाही. असे असतानाही सभापती महोदय आपल्या निणर्यात शिंदे गटाचा स्वतंत्र प्रतोद (व्हिप) नेमण्याचा निर्णय वैध होता, असे नमूद करतात. वास्तविक शिंदे गटाची प्रतोद नियुक्ती अवैध आहे असा स्पष्ट निर्णय गेल्या वर्षी मे महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने दिलेला होता. परंतु सभापती महोदय मात्र सर्वोच्च न्यायालयाविरोधात निर्णय घेतात. देशाच्या घटनेने त्यांना तसा विशेष अधिकार दिला आहे काय?

या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी द्यावे तर त्यातून आणखी एक विसंगती समोर येते. सभापती महोदयांच्या मतानुसार समजा शिंदे गटाची प्रतोद नेमण्याची कृती रास्त होती असे मान्य केले तर या प्रतोदाने जारी केलेल्या आदेशांचा भंग करणाऱ्यांचे काय? शिंदे गटाने नेमलेल्या प्रतोदाचा आदेश मान्य करणे हे उद्धव ठाकरे गटाच्या आमदारांस बंधनकारक होते. अशा आमदारांची संख्या १४ इतकी आहे. उद्धव ठाकरे गटाचे तीन-तेरा वाजत होते तरी हे १४ मात्र मूळच्या शिवसेनेस चिकटून राहिले. त्यांनी शिंदे गटाच्या प्रतोदाने दिलेल्या आदेशानुसार विधानसभेत मतदान करण्यास नकार दिला. पक्षांतर बंदी कायद्यानुसार प्रतोदाने दिलेल्या आदेशानुसार सदनाच्या पटलावर मतदान न करणे हे कारण सदर लोकप्रतिनिधींस अपात्र ठरवण्यास पुरेसे असते.

**भागा वरखडे**

पण महाराष्ट्र विधानसभेचे सभापती महोदय तेही करत नाहीत. एका बाजूने ते शिंदे गटाच्या आमदाराची प्रतोदपदी नियुक्ती ग्राह्य धरतात, शिंदे यांची शिवसेना हीच खरी शिवसेना असा निर्णयही देऊन ते मोकळे होतात पण तरी त्याच वेळी या अधिकृत शिवसेनेच्या अधिकृत प्रतोदाच्या आदेशाचा भंग केला तरी अनधिकृत शिवसेनेच्या आमदारांस ते अपात्र मात्र ठरवत नाहीत. या राजकीय औदार्याचे वैधानिक कारण काय हे सांगण्याची गरज सभापती महोदयांस वाटत नाही.

या सगळ्याचा अर्थ इतकाच की सभापती महोदयांच्या निणर्यामुळे पुन्हा एकदा नव्याने कज्जेदलाली सुरू होणार हे निश्चित. वास्तविक आधीच सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची दखल योग्य वेळी घेतली असती तर ते इतके चिघळतेच ना. आता पुन्हा यावर सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा निर्णय ह्यअनधिकृतह्ण शिवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला आहेच. ते तसे सर्वोच्च न्यायालयात गेल्यावर न्यायालय किती तत्परतेने या प्रकरणी निवाडा करते यावर आता महाराष्ट्राच्या भावी राजकारणाची दिशा अवलंबून असेल हे उघड आहे. यातील दुसरी घटनात्मक यंत्रणा म्हणजे निवडणूक आयोग. त्या बिचाऱ्यांकडून फार अपेक्षा करण्यात काही अर्थ नाही. येऊ घातलेल्या निवडणुकांत सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांविरोधात आचारसंहिता भंगाचे आरोप विरोधकांनी केल्यास काय करायचे, आपण तटस्थ यंत्रणा आहोत ही प्रतिमा (तरी) लक्षात घेऊन काय उपाय योजना करावी या विवंचनेने निवडणूक आयुक्तांच्या जिवास आतापासूनच घोर लागला असेल. त्यात आता हे शिवसेनेचे लचांड. त्यामुळे या प्रकरणी न्यायालयानेच काही दखल घेतली आणि हालचाल केली तर काही घडण्याची शक्यता आहे. नपेक्षा सभापती महोदयांनी आपला ह्यनिकालह्ण दिलेला आहेच. न्याय होणार की नाही, या प्रश्नाच्या उत्तरात रस आहे कोणास? या प्रश्नाच्या उत्तरात पक्षांतरबंदी कायद्याचे आणि म्हणून लोकशाहीचे भवितव्य दडलेले आहे. सर्वोच्च न्यायालय काय भूमिका घेते हे यापुढे महत्त्वाचे असेल.

## स्व.पै. केशवराव ढोरे प्रतिष्ठानच्या सामुदायिक विवाह सोहळा समितीच्या अध्यक्षपदी रोहिदास गराडे

### कार्यक्रम प्रमुखपदी अरुण वाघमारे व कार्याध्यक्षपदी बाळासाहेब तुमकर

### १ मे २०२४ ला होणार सामुदायिक विवाह सोहळा

**वडगाव मावळ :** येथील स्व.पै. केशवराव ढोरे प्रतिष्ठानच्या सामुदायिक विवाह सोहळा समितीच्या अध्यक्षपदी रोहिदास गराडे यांची तर कार्यक्रम प्रमुखपदी अरुण वाघमारे व कार्याध्यक्ष पदी बाळासाहेब तुमकर यांची निवड करण्यात आली आहे. दरम्यान यावषी १ मे रोजी सामुदायिक विवाह सोहळा होणार आहे.


प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष पंढरीनाथ ढोरे यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या बैठकीत सामुदायिक विवाह सोहळ्याचे नियोजन व नूतन कायर्कारिणी जाहीर करण्यात आली. या वेळी प्रतिष्ठानचे पदाधिकारी विलास दंडेल, राजेंद्र वहिले, अर्जुन ढोरे, गणेश विनोदे, अतुल राऊत, काशिनाथ भालेराव, सुनील शिंदे, विवेक गुरव, सदाशिव



रोहिदास गराडे



बाळासाहेब तुमकर



अरूण वाघमारे

गाडे, शंकर ढोरे, अजय धडवले, शरद ढोरे, सोमनाथ धोंगडे, खंडू काकडे, महेश तुमकर, गणेश ढोरे, अक्षय बेल्हेकर, विनायक लवंगारे, संजय दंडेल, गणेश झरेकर, कार्तिक यादव, सुधीर ढोरे, सतीश गाडे, सुहास विनोदे, विकी ढोरे, अतुल ढोरे आदी उपस्थित होते.

यावषीचा सामुदायिक विवाह सोहळा १ मे २०२४ रोजी संपन्न होणार असून, यामध्ये सर्व जाती धर्मातील जोडप्यांचा समावेश असणार आहे. तसेच, जोडप्यांना संसारपयोगी भांडी, लग्नाचा पोशाख, साड्या, वऱ्हाडी मंडळींसाठी भोजन, नवरदेवाची मिरवणूक आदींची व्यवस्था करण्यात येणार आहे. १० एप्रिल पर्यंत जोडप्यांची नोंदणी करण्याची अंतिम मुदत असून, नागरिकांनी या सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रतिष्ठानच्या माध्यमातून संपन्न होत असलेला हा उपक्रम गेली दहा वर्षांपासून राबविण्यात येत असून सुमारे १६५ जोडपी विवाहबद्ध झाले आहेत. सामुदायिक विवाह सोहळा समिती नूतन कायर्कारिणी : अध्यक्ष रोहिदास गराडे, कार्यक्रमप्रमुख अरुण वाघमारे, कार्याध्यक्ष - बाळासाहेब तुमकर, उपाध्यक्ष - नंदकुमार ढोरे, योगेश वाघवले, सचिव - संभाजी येळवंडे, खजिनदार - अनिल कोद्रे, सहखजिनदार - संतोष निघोजकर.

## अयोध्येचा राम भाजप विरोधकांना कसा पावेल?



**दिवाकर शेजवळ**

यंदाचे वर्ष लोकसभा निवडणुकीचे आहे. त्यादृष्टीने भाजप- एन डी ए आणि काँग्रेस- इंडिया आघाडी या दोन्ही फ्रंटची पूर्वतयारी आणि मोर्चेबांधणी वेगात सुरू झाली आहे. त्यात काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या 'यात्रे' चा दुसरा अध्याय समाविष्ट आहे. त्या यात्रेच्या नावात आता बदल करण्यात आला आहे. काँग्रेसच्या धोरणात्मक आणि वैचारिक भूमिकेतील गोंधळाचे ते निदर्शक म्हणावे लागेल. शिवाय, काँग्रेस यात्रेच्या दुसऱ्या टप्प्यातही ईव्हीएम विरोधी जनमत संघटित करण्याची संधी राहुल गांधी यांनी दुसऱ्यांदा गमावली आहे. ईव्हीएम कायम असताना भाजपला सत्तेतून हद्दपार करता येईल, याची खात्री इंडिया आघाडीतील किती पक्ष देवू शकतात? शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी तर, बॅलट पेपरवर एक तरी निवडणूक घेवून दाखवा,असे आव्हान निवडणूक आयोगाला दिले आहे.

दुसरीकडे, लोकसभा निवडणुकीसाठी भाजपची अतिशय नियोजनबध्दरित्या तयारी अनेक पातळीवर सुरू आहे. ईव्हीएमचे हुकमी हत्यार हाताशी असले तरीही त्या पक्षाची निवडणुकीसाठी सारी भिस्त त्यावर कधीच नसते, हे मान्य करावेच लागेल.

मतांचे ध्रुवीकरण घडवणाऱ्या मुद्द्यांची अचूक निवड, त्यावरून वातावरण निमिती, मतदार याद्या, घरोघरी संपर्कासाठी व्यापक मोहीम, बूथपातळीवरील व्यवस्थापन, वस्तीमधील बैठकांपासून जाहीर सभांमधून आक्रमक प्रचार यात भाजपचा हात कोणी धरू शकत नाही.

यावेळच्या लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर अयोध्येत रामाच्या मूतीची प्रतिष्ठापना होत आहे. त्याने भारावलेल्या वातावरणात विरोधी पक्ष स्वतःहून भाजपच्या सापळ्यात अडकताना दिसत आहेत. मग मुद्दा शाळांमधील राम चारित्रावरील स्पर्धांचा असो, रामाच्या आहाराचा असो की, रामायणावरील चिकित्सक चर्चेचा असो. विरोधी पक्षांच्या नेत्यांनी चालवलेली मोहिमेच्या रुपातील नकारात्मक चर्चा ही भाजपला अपेक्षित ध्रुवीकणास हातभार लावत आहे. हे आत्मघातकी वर्तन विरोधी पक्षांतील एकमताच्या सामूहिक रणानीतीच्या अभावातून घडत आहे की, नेत्यांच्या अदूरदशी आणि वाचाळ वृत्तीमुळे? 'इंडिया आघाडी' च्या धुरिणांनी याचा शोध घेतला पाहिजे.

दर निवडणूक निकालानंतर ईव्हीएमवर लक्ष केंद्रित होवू न देण्याची पुरेपूर खबरदारी भाजप घेत आला आहे. निवडणुकीपूवी तापवलेले त्या पक्षाचे मुद्दे हे केवळ धृविकरणासाठी नसतात. तर , आपल्या विजयाचे श्रेय देण्यासाठी ती नेपथ्य रचनाही ठरत असते. त्या मुद्द्यांनीच भाजप जिंकला, हे मग लोकांनाही तार्किकदृष्ट्या पटून जाते. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत अयोध्येचा राम भाजपविरोधकांना कसा पावेल?

## ठाण्यात आज दिवसभर अवजड वाहनांना बंदी

**ठाणे :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राज्यातील विविध महत्त्वकांक्षी प्रकल्पाचे लोकार्पण केले जाणार आहे. या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी नवी मुंबईत येत आहेत. अवजड वाहनांमुळे नवी मुंबईत कोंडी होऊ नये म्हणून उद्या, शुक्रवारी ठाण्यात अवजड वाहनांना प्रवेश बंदी लागू केली आहे.

गुजरात राज्य आणि भिवंडी येथून हजारो अवजड वाहने उरण जेएनपीटी येथे वाहतुक करत असतात. ही अवजड वाहने ठाण्यातील मुंब्रा बाह्यवळण, शिळफाटा मार्गे नवी मुंबईत जातात. तसेच नाशिक येथून सुटणाऱ्या अवजड वाहनांचा भारही या मार्गावर मोठा असतो. ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रात अवजड वाहनांना दुपारी १२ ते ४ आणि रात्री ११ ते पहाटे पाच या वेळेत वाहतुक करण्यास मुभा आहे.

गुजरात राज्य आणि भिवंडी येथून हजारो अवजड वाहने उरण जेएनपीटी येथे वाहतुक करत असतात. ही अवजड वाहने ठाण्यातील मुंब्रा बाह्यवळण, शिळफाटा मार्गे नवी मुंबईत जातात. तसेच नाशिक येथून सुटणाऱ्या अवजड वाहनांचा भारही या मार्गावर मोठा असतो. ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रात अवजड वाहनांना दुपारी १२ ते ४ आणि रात्री ११ ते पहाटे पाच या वेळेत वाहतुक करण्यास मुभा आहे.

## हिट अँड रनबाबत चालक-मालकांच्या प्रतिनिधीसोबत चर्चा करावी : बाबा कांबळे




**पुणे :** रिक्षा चालक मालकांसाठी कल्याणकारी महामंडळ स्थापन करून त्यांना म्हातारपणी पेन्शन मिळाली पाहिजे, मुक्त रिक्षा परवाना बंद झाला पाहिजे, इ चलन बंद झालं पाहिजे, याबरोबर देशभरामध्ये सध्या सुरू असलेल्या हिट अँड रन प्रकरणी सरकारने रस्त्यावर उतरून आंदोलन करणाऱ्या चालक-मालकांच्या प्रतिनिधी सोबत चर्चा करावी, चालक-मालकांच्या प्रतिनिधी सोबत चर्चा केल्याशिवाय, व आमचे प्रश्न सोडवल्याशिवाय माघार घेणार नाही, महाराष्ट्रसह देशभरामध्ये स्टेरिंग छोडो आंदोलन सुरू झाले असून देशातील चालक-मालक हे रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहेत, आंदोलन करणाऱ्या संघटना प्रतिनिधी सोबत चर्चा करण्याऐवजी सरकार मात्र उद्योगपती आणि भांडवलदार ट्रान्सपोर्टस सोबत चर्चा करत आहेत, यामुळे देशभरातील 25 करोड चालक मालकांमध्ये तीव्र नाराजी पसरली यामुळे पुन्हा 9 जानेवारीपासून स्टेरिंग छोडो आंदोलन सुरू करण्यात आले असून सरकारने चालक-मालकांच्या प्रतिनिधी सोबत चर्चा करावी असे आवाहन बाबा कांबळे यांनी सरकारला केले आहे,

लोणावळा येथे महाराष्ट्र रिक्षा पंचायत व लोणावळा शहरातील विविध संघटनेच्या वतीने रिक्षा चालक मालकांचा मेळावा मोठ्या उत्साहांमध्ये संपन्न झाला यावेळी बाबा कांबळे बोलत होते,

यावेळी प्रादेशिक परिवहन विभागाचे प्रदीप शिंगारे, महाराष्ट्र रिक्षा पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष बाबुभाई शेख अध्यक्ष, आनंद सदावर्ते, गुजरात येथील सतीश जागडा आदी उपस्थित होते.

यावेळी बाबा कांबळे म्हणाले महाराष्ट्रातील पंचवीस करोड चालक मालकांनी देशभरामध्ये एक तारखेपासून आंदोलन सुरू केले परंतु सरकारने मात्र ट्रान्सपोर्ट धारकांचे मोठे उद्योगपती ऑल इंडिया मोटर काँग्रेस यांच्याशी चर्चा करून आंदोलन माघार घेतले असे जाहीर केले. ऑल इंडिया मोटर काँग्रेसने देशातील 25 करोड ड्रायव्हर यांची दिशाभूल करून ज्यांनी आंदोलन सुरूच केले नाही त्यांना आंदोलन माघार घेण्याचा अधिकार नाही. हे आंदोलन देशातील 25 कोटी चालक-मालकांनी सुरू केले आहे परंतु त्यांच्याशी चर्चा न करता ऑल इंडिया मोटर्स काँग्रेसच्या वतीने परस्पर हे आंदोलन मागे घेतले असे जाहीर करण्यात आले यामुळे देशभरातील 25 करोड चालकांमध्ये तीव्र संताप पसरला आहे,या मुळे त्यांनी पुन्हा 09 जानेवारी 2024 मध्ये रात्रीपासून महाराष्ट्रात देशभरामध्ये स्टेरिंग छोडो करून चक्काजाम करण्याचा निर्णय देशातील चालक मालकांने घेतला, आहे, असे बाबा कांबळे यावेळी म्हणाले.

कार्यक्रमाच्या संयोजनासाठी आनंद सदवरते, विनय बच्चे, भगवान घनवट, विकास खेंगरे, भाऊ शिवेकर वासिम खान चल्लरभाई शेख यांनी परिश्रम घेतले.


## पायाभूत सुविधांच्या विकासात 'बिल्डर्स 'चे योगदान मोलाचे : मिलिंद पानपाटील

**पुणे :** देशातील पायाभूत सुविधांची उभारणी, तंत्रज्ञानाचा अंतर्भाव, नदी जोड प्रकल्प, भारतमाला प्रकल्प, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, आवास योजना यांसारख्या शासकीय योजनांची, प्रकल्पांची पूतर्ता, तसेच रोजगार निमिती करण्यात 'बिल्डर्स' महत्वाचे योगदान देत आहेत, असे प्रतिपादन राष्ट्रीय जल अकॅडमीचे संचालक मिलिंद पानपाटील यांनी केले.

बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया (बीएआय) पुणे सेंटरच्या वतीने आयोजित 'बिल्डर्स डे'च्या कार्यक्रमात पानपाटील बोलत होते. रेसिडेन्सी क्लब येथे झालेल्या कार्यक्रमात ग्रुप कॅप्टन (निवृत्त) प्रवीर अशोक पुरोहित, 'बीएआय'चे चेअरमन डी. एस. चौधरी, व्हाईस चेअरमन सुनील मते, मानद सचिव अजय गुजर, सहसचिव महेश मायदेव, खजिनदार राजाराम हजारे, कार्यक्रमाचे समन्वयक शशिकांत किल्लेदारपाटील आदी मान्यवर उपस्थित होते. 'नव्या भारताचा शाश्वत विकास' अशी या कार्यक्रमाची संकल्पना होती. बांधकाम क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल प्रा. एस. बी. भोंडे, एस. एम. मेहता, अशोक अटकेकर, सी. एच. रतलानी, संजय आपटे यांना सन्मानित करण्यात आले.

प्रवीर अशोक पुरोहित म्हणाले, भारत गेल्या काही वर्षांत जोमाने प्रगती करत आहे. विकासाचा दर, जीडीपी वाढण्याची गरज आहे. शासनाने चांगली धोरणे केली असून, अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. मात्र, प्रत्येक भारतीयाने माणुसकी, प्रामाणिकपणा व स्वयंप्रेरणेने योगदान द्यायला हवे. यातूनच आपण संपूर्ण जगाला मार्गदर्शक असा भारत देश घडू शकेल.

डी. एस. चौधरी यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. शशिकांत किल्लेदारपाटील यांनी 'बिल्डर्स डे'च्या आयोजनामागील भूमिका विशद केली. संजय आपटे व आर. एस. वर्मा यांनी सूत्रसंचालन केले. अजय गुजर यांनी आभार मानले.




मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

# लिटल फ्लॉवर स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

## समाजातील विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांचा संस्थेच्या वतीने सन्मान चिन्ह देवून गौरविण्यात आले



**हडपसर :** श्री बालाजी सेवा प्रतिष्ठान संचालित लिटिल फ्लॉवर इंग्लिश मिडीयम स्कुल CBSE/SSC या संस्थेचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा ८ व ९ जानेवारी रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

संस्थेतील विद्यार्थ्यांनी विविध कलागुण सादर करत आपली कला सादर केली. सामाजिक संदेश देणारे तसेच आपल्या इतिहासाची आठवण करून देणारे अनेक नृत्याविष्कार यावेळी सादर करीत यावेळी विद्याथी आणि पालकांना मंत्रमुग्ध केले.

त्याच सोबत संस्थेच्या वतीने दरवषी दिले जाणारे समाजभूषण पुरस्कार प्रदान केले गेले, यावर्षी संस्थेने प्रसिद्ध चित्रपट व नाटक निर्माते आणि अखिल भारतीय चित्रपट महामंडळ अध्यक्ष मेघराज राजे भोसले, वास्तूतज्ज्ञ आणि ज्योतिषाचार्य तसेच आनंदी वास्तू या संस्थेचे संस्थापक आनंद पिंपळकर, महिलांच्या न्याय व हक्कांसाठी अनेक वर्ष लढा देणाऱ्या भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा तृप्ती देसाई, सैन्य दलात सेवा देनारे व सेवानिवृत्ती स्वकष्टार्जित ५ एकर जागा सरकारला दान करणारे अली असग़र अखानी आणि प्रसिद्ध महिला शिल्पकार आणि इंडिया बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड ने नोंद घेतलेल्या सुप्रिया शिंदे यांना समाजभूषण पुरस्काराने सन्मानित केले गेले. याप्रसंगी पुणे ग्रामीणचे अप्पर पोलीस अधीक्षक मितेश घट्टे साहेब आणि सामाजिक कार्यकर्ते राज देशमुख उपस्थित होते.

विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास व्हावा आणि त्यांना समाजसेवेची प्रेरणा मिळावी म्हणून आपण विविध क्षेत्रातील मान्यवरांना समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करत असतो असे प्रतिपादन यावेळी संस्थेचे अध्यक्ष संजय सदाशिव हरपळे आणि सुधा संजय हरपळे यांनी सांगितले.

# हडपसर विधानसभा भाजप सरचिटणीस पदी शक्तीसिंग कल्याणी



**हडपसर :** भारतीय जनता पार्टी हडपसर विधानसभा मतदार संघ भाजप सरचिटणीस पदी रामटेकडी येथील भाजप कार्यकर्ते शक्तीसिंग कल्याणी यांची निवड करण्यात आली. निवडीचे पत्र कोंढवा येथे घेण्यात आलेल्या कार्यकर्ता मेळावा मध्ये भारतीय जनता पाटीचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते देण्यात आले. रामटेकडी भागातील भारतीय जनता पाटीचे एकनिष्ठ कार्यकर्ता म्हणून परिसरात ओळखले जाणारे शक्तिसिंग कल्याणी यांची हडपसर विधानसभा मतदार संघाच्या सरचिटणीस पदी त्यांचे कार्यकर्त्यांकडून अभिनंदन करण्यात आले. यावेळी भारतीय जनता पाटीचे नेते माजी आमदार योगेश टिळेकर , संदीप दळवी अनिल येवले शहराचे सरचिटणीस सुभाष जंगले आबा शिळीमकर भूषण तुपे व असंख्य कार्यकर्ते उपस्तित होते.

निवडीनंतर शक्तीसिंग कल्याणी म्हणाले की, माजी आमदार योगेश टिळेकर व भाजप नेते यांच्या मार्गदशर्नानुसार पक्षाचे काम तळागाळापर्यंत पोहचविणार आहे.

# अतुल जिनदत्त शहा बारामती महाराष्ट्र जन गौरव पुरस्कार पुरस्काराने सन्मानित

**सातारा :** अतुल जिनदत्त शहा, बारामती यांना विविध धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील ऊत्कृष्ट कार्याबद्दल राजभवन, मुंबई येथे झालेल्या समारंभात महाराष्ट्राचे महामहीम राज्यपाल सन्मा. श्री रमेशजी बैस यांच्या शुभहस्ते महाराष्ट्र जन गौरव पुरस्कार प्रदान करून गौरवण्यात आले.

संपूर्ण समाजात ज्या व्यक्तींनी सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक कार्यात लक्षणीय कार्य केले आहे अशा महनीय व्यक्तींच्या कार्याचा गौरव दरवषी सपना सुबोध सावजी ट्रस्टच्या वतीने करण्यात येतो. यामध्ये भजन सम्राट पद्मश्री अनुप जलोटा, फिल्म अभिनेता सचिन पिळगावकर व अन्य विशेष प्रभूतीना व बारामती येथील चंदूकाका सराफ ज्वेल्स चे मालक व कुसुम व जिनदत्त शाह वेल्फेअर फाउंडेशन बारामती संचालित दयोदय गोशाळेचे अध्यक्ष अतुलजी शहा तसेच बारामती येथील डॉक्टर दीप्ती सतीश पवार ह्यांना पुरस्कार प्रदान केला आहे. यावर्षी विविध क्षेत्रातील ३५ महनीय व्यक्तींची निवड करण्यात आली होती .

अतुलजी शाह यांच्या मार्गदर्शनाखाली विविध धार्मिक, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात अविरतपणे नियोजनबद्ध उपक्रम राबविले जातात. गोसेवा व गोमाता संरक्षणासाठी 'दयोदय गोशाळेची स्थापना करून गायींचे गोबर व गोमूत्र पासून स्वर्णामृतचे उत्पादन सेंद्रिय शेतीसाठी केले जाते आणि मानवाला विषमुक्त अन्न मिळण्यासाठी यांचा प्रचार व प्रसार करून मागील चार वर्षापासून हा उपक्रम राबवित आहेत.

याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना अतुल शहा म्हणाले की, परम पूजनीय आचार्य श्री १०८ विद्यासागर जी महाराज यांच्या आशीर्वादाने धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक कार्य करण्याची प्रेरणा मिळत असून या कार्यात सौ. संगीता शाह व माझे सर्व सहकारी यांचेही योगदान आहे.

याप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री सुबोधजी सावजी, सपना सुबोध सावजी ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. राहुल सावजी, संगीता अतुल शहा व अन्य मान्यवर उपसथित होते

# शिवसेना शिंदे गटाचे नेते ॲड. सचिन जोरे राष्ट्रवादीच्या वाटेवर

## मुंबई येथे घेणार शरद पवारांची भेट



**बारामती :** शिवसेना शिंदे गटाचे नेते ॲड. सचिन जोरे लवकरच राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष मा. शरद पवार यांची भेट घेणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रानी दिली. माजी न्यायाधीश राहिलेले ॲड.. जोरे यांनी वंचित बहुजन आघाडी कडून २०१९ मध्ये इंदापूर विधानसभा निवडणूक लढवली होती व तिसऱ्या क्रमांकावर मते घेतली होती. त्यानंतर वंचितच्या प्रदेश कमिटीवर कार्य करीत असताना महाराष्ट्रभर दौरा, मेळावे करून राज्यभर त्यांचा दांडगा लोकसंपर्क निर्माण केला आहे. एक उच्चशिक्षित न्यायाधीश म्हणून कार्यरत राहिलेले ॲड.. जोरे माढा लोकसभा उमेदवार म्हणून राष्ट्रवादीच्या वाटेवर आहेत.

अलीकडील काळात मतदान मतदानाची टक्केवारी कमी होत असल्याचे लक्षात घेऊन त्यांनी संपूर्ण माढा मतदारसंघात मतदान करणे हा माझा अधिकार आहे आणि मी मतदान करणारच असे मतदार जनजागृती अभियान राबवले असून त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. व्यवसाय मार्गदर्शन, कायदेविषयक शिबिरे, करिअर मार्गदर्शन, शिबिरे, रक्तदान शिबिरे आयोजित करून त्यांनी सामाजिक कार्यात एक वेगळाच ठसा उमटवला आहे.

माढा लोकसभा मतदारसंघात ओबीसी मतदार बांधव तुलनेने जास्त आहेत व सद्यस्थितीमध्ये एक धनगर समाजाचा नवा चेहरा म्हणून ओबीसी वर्गातून त्यांना वाढता पाठिंबा दिसून येत आहे.

# भाजप पुणे शहर ओ.बी.सी. आघाडी सरचिटणीस पदी स्मिता गायकवाड निवड




कार्यकर्त्या स्मिता गायकवाड यांची निवड करण्यात आली असून निवडीचे पत्र भाजप प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उच्च व.तंत्र शिक्षण महापौर मुरलीधर मोहळ, ओबीसी मोर्चा अध्यक्ष नामदेव.माळवदे उपाध्यक्ष राजेशजी पांडे, माजी. आमदार जगदीश मुळीक,. माजी नगरसेवक श्रीनाथ भिमाले,

यावेळी स्मिता गायकवाड म्हणाल्या की, पक्षाने मला जे पद दिले त्या पदाचा न्याय हक्कासाठी उपयोग करीन. .पक्षाने दिलेल्या जबाबदारी योग्य रित्या राबविन.

# सांगली लोकसभा स्वाभिमानी स्वबळावर लढणार



**सांगली :** पक्षाने संधी दिल्यास सांगली लोकसभा लढविणार असल्याची घोषणा स्वाभिमानी पक्षाचे जिल्हाध्यक्ष महेश खराडे यांनी केली सांगली लोकसभा मतदार संघाची निवडणूक स्वाभिमानीच्या वतीने ताकदीने लढविण्याचा निर्धार जिल्हा बैठकीत करण्यात आला ही निवडणूक एक व्होट एक नोट या तत्त्वावर लढविण्याचे ठरविण्यात आले ही बैठक बुधवारी सांगलीतील सर्किट हाऊस येथे झाली अध्यक्षस्थानी संघटनेचे जिल्हाध्यक्ष पोपट मोरे होते बैठकीला कार्याध्यक्ष संदीप राजोबा युवा आघाडीचे संजय बेले भागवत जाधव बाबा सांदरे राजेंद्र पाटील रमेश माळी शिवाजी पाटील दामाजी दुबल राजेंद्र माने संजय खोळखुंबे भरत चौगुले बाळासाहेब जाधव अमित रवतले तानाजी धनवडे भुजग पाटील शशिकांत माने गुलाब यादव बाळासाहेब मगदूम जगग्नात भोसले आदी उपस्थित होते

या वेळी बोलताना महेश खराडे म्हणाले आगामी लोकसभा निवडणुकीसाठी स्वाभिमानी कोणत्याही पक्षा बरोबर आघाडी करणार नाही माजी खा राजू शेट्टी यांनी राज्यात सहा लोकसभा लढविण्याची घोषणा केली आहे त्यात सांगली लोकसभेचा ही समावेश आहे त्यामुळे सांगली लोकसभा ताकदीने निवडणूक लढविण्याचा निर्धार जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी केला आहे आमच्या कडे पैसे नाहीत मात्र आमच्या कार्यकर्त्यांकडे हतीचे बळ आहे त्याच्या जोरावर एक बोट आणि एक नोट या तत्त्वावर ही निवडणूक लढविली जाईल

कामाच्या जोरावर ही निवडणूक लढविण्यात येणार आहे ऊस दर , दूध, द्राक्ष बेदाणा कर्ज माफी , दिवसा वीज मिळावी यासाठी केलेला संघर्ष घरा घरा पर्यंत पोहचवून मतदारांना लढणाऱ्या ना साथ बुड व्याना घरी बसवा, ससदेत दहा वर्षात शब्द ही न काढणाऱ्या मौनी खासदारांना घराचा रस्ता दाखविण्याची वेळ आली आहे पोपट मोरे म्हणाले ही निवडणूक सोपी नाही त्यामुळे सर्वांनी एक दिलाने संघटित पणे ही निवडणूक लढवूया संदीप राजोबा म्हणाले कोणत्याही परिस्थितीत ही निवडणूक जिकायची या निर्धाराने कामाला लागू या संजय बेले म्हणाले कार्यकर्त्यांनी आता पासून कामाला लागावे मात्र हे शिव धनुष्य पेलने सोपे नाही त्यासाठी सर्वांनीच वेळ दिला पाहिजे राजकीय दबाव झुगारून दिला पाहिजे भागवत जाधव राजेंद्र माने सूरज पाटील विश्वजित गायकवाड अख्तर संडे आबासाहेब कचरेअड सुरेश घागरे शिवाजी पाटील यांच्यासह अन्य जणांनी मनोगत व्यक्त केले बैठकीला तानाजी साठे अनिल पाटील चंद्रकांत पाटील सुनील पाटील अशोक खाडे शशिकांत माने निशिकांत पोतदार उत्तम चंदनशिवे भीमराव निकम नामदेव. लोखंडे बाबुराव शिंदे मुकेश पाटील प्रकाश देसाई प्रताप पाटील सिकंदर शिकलगार सागर पाटील विशाल पाटील दत्तात्रय जाधव पंढरीनाथ जाधव महादेव पवार महादेव दीक्षित शांताराम पाटील हणमंत पाटील आदीसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते

**दोन लाखाची मदत जाहीर**

एक बोट एक नोट या पद्धतीने ही निवडणूक लढविणार असल्याने या बैठकीत फत्तेसिंग गायकवाड 50 हजार, पोपट मोरे 25 हजार, राजेंद्र पाटील 25 हजार, गुलाब यादव भुजंग पाटील 50 हजार, भागवत जाधव 15 हजार, दिलीप जगताप 10 हजार इतकी मदत देणार असल्याचे जाहीर केले त्यामुळे लोकांनी आमच्याकडे पैसे नाहीत पण आम्ही लोकासठी लढतो जनतेने आम्हाला एक व्होट द्यावे आणि नोट ही द्यावी असे आवाहन महेश खराडे यांनी केले.

# आरोग्य विषयक मार्गदर्शन काळाची गरज - डॉ. मनिषा बाबर




**म्हसवड :** शालेय विद्याथिनीच्या भविष्यातील शारीरिक धोके टाळण्यासाठी किशोरवयीन मुलींना आरोग्य विषयक मार्गदर्शन ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉक्टर मनिषा विकास बाबर यांनी म्हसवड येथे केले.

कृषि विकास प्रतिष्ठान संचलित क्रांतीवीर इंग्लिश मीडियम स्कूल म्हसवड येथे किशोरवयीन मुलींचे आरोग्यविषयक शिबिर आयोजित केले होते. समुपदेशन शिबिरासाठी तज्ञ मार्गदर्शक म्हणून डॉ.मनिषा बाबर तर कार्यक्रमाच्याअध्यक्ष म्हणून संस्थेच्या सचिव सुलोचना बाबर उपस्थित होत्या. यावेळी डॉ. मनिषा बाबर म्हणाल्या, जीवनातील किशोरवयीन अवस्था ही एखाद्या आनंदी फूल झाडाप्रमाणे असते. अत्यंत निरागस, स्वच्छंदी अशी ही अवस्था नाजूक व महत्वपूर्ण असते. शालेय स्तरावरील किशोरवयीन मुलींना भविष्यातील अनेक अडचणी व धोक्याची कल्पना योग्यवेळी सांगितली जात नाही त्यामुळे अनेक संकटांना तोंड द्यावे लागते. किशोरवयीन मुलींच्या आरोग्याबाबत शालेय स्तरावर प्रबोधन व जनजागृतीची योग्य वेळी व योग्य व्यक्तीमार्फत होणे गरजेचे आहे. मुलींनी अभ्यासाबरोबरच आरोग्याची काळजी घेतली पाहिजे. मुलींनी मासिक पाळीच्या वेळी योग्य व संतुलित आहार घेणे गरजेचे आहे. मुलींच्या वेगवेगळ्या शारिरीक समस्यांकडे वेळीच लक्ष दिले पाहिजे. यासाठी मुलींनी आपल्या समस्या आई किंवा शिक्षिका यांना सांगितल्या पाहिजेत अन्यथा अनेक संकटांना तोंड द्यावे लागेल असा इशारा डॉ.बाबर यांनी दिला.

यावेळी डॉ.बाबर यांनी मुलींच्या आरोग्यावर चढउतार, अनावश्यक भिती, मासिक पाळी व यासंबंधी घ्यावयाची काळजी त्याबाबतचे उपचार, पौष्टिक आहार, जंक फूड खाण्याचे तोटे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. महिला व किशोरवयीन मुलीसाठी शासनाच्या सुद्धा अनेक योजना आहेत त्याचा लाभ घेणे गरजेचे असल्याचे डॉक्टर बाबर यांनी तपशीलवार सांगितले .यावेळी क्रांतिवीर संकुलाच्या सचिव सुलोचना बाबर यांनी किशोरवयीन मुलींचे प्रश्न व योग्य वेळी घ्यावयाची काळजी याविषयी मार्गदर्शन केले तसेच या शाळेत मुलींच्या साठी विविध उपक्रम राबवली जात असल्याचे सांगितले. या कार्यक्रमासाठी इयत्ता ६ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यींनींनी सहभाग घेतला होता. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुवर्णा दराडे यांनी केले तर पाहुण्यांचे आभार वनश्री सावंत यांनी मांडले. या कार्यक्रमासाठी शाळेतील शिक्षिका व मुली मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# घरकुल योजनांच्या अनुदानात वाढ करण्यासाठी राष्ट्रवादीचे दंडवत आंदोलन



**इंदापूर :** शासनाकडून मिळणाऱ्या विविध घरकुल योजनांच्या अनुदानात वाढ व्हावी. या प्रमुख मागणीसह इतर मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्याकरिता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून (शरद पवार गट) बुधवारी (दि.१०) इंदापूर शहरातील बाबा चौक ते पंचायत समिती दरम्यान दंडवत आंदोलन करण्यात आले.

राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष सागर मिसाळ यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या अनोख्या दंडवत मोर्चात जिल्हा उपाध्यक्ष समद सय्यद, तालुकाध्यक्षा छाया पडसळकर, शहराध्यक्ष ॲड. इनायतअली काझी, शहराध्यक्षा रेश्मा शेख, संजय शिंदे,विकास खिलारे,अनिल ढावरे, अक्षय कोकाटे, दिलीप बेहकरे, श्रीकांत मखरे,अशोक पापत, रायचंद नरळे,अजय पारसे,मनेश जाधव, मालोजी शेंडगे, अनिल दणाने,रोहिदास जगताप, संजय दुपारगुडे, बाळासाहेब चितळकर, विशाल काटकर आदी उपस्थित होते.

गरिबांना न्याय मिळालाच पाहिजे. अपंग बांधवांच्या अनुदानात वाढ झालीच पाहिजे. घरकुलासाठी वाळू मिळालीच पाहिजे अशा घोषणा देत आंदोलनकर्त्यांनी याप्रसंगी बोंबाबोंब केली.तसेच डीबीटी च्या योजना त्वरित चालू कराव्यात. पाणीटंचाईच्या अनुषंगाने बोरवेलसाठी तात्काळ मंजुरी मिळावी. बंद पडलेले हातपंप दुरुस्त करावेत. कलावंतांच्या अनुदानात वाढ करून रखडलेले अनुदान द्यावे. आंतरजातीय विवाह अनुदानात वाढ करावी. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना अंतर्गत अल्पभूधारक शेतकरी असलेची अट रद्द करून शिथिल करण्यात यावी. जल जीवन मिशन अंतर्गत चालू असणाऱ्या कामांची गुणवत्ता व दर्जा तपासणीकरीता विशेष पथकाची नियुक्ती करण्यात यावी. अशा एकूण १८ विविध मागण्या असणारे निवेदन गटविकास अधिकारी विजयकुमार परीट यांना यावेळी देण्यात आले. दरम्यान,दंडवत मोर्चात सहभागी आंदोलनकर्त्यांनी डोक्याला व हाताला काळी पट्टी बांधून सरकारचा निषेध केला.

# पाटसला विद्यार्थ्यांना गालफुगीच्या रोगांचे थैमान

## विद्यार्थी, पालक भयभीत, आरोग्य विभागाचे दुर्लक्ष

**दौंड :** दौंड तालुक्यातील पाटस परिसरातील जिल्हा परिषदेच्या इयत्ता पहिली ते चौथी च्या शाळेतील विद्यार्थ्यांना मागील काही दिवसांपासून गाल फुगी आल्याने त्रस्त झाले आहेत. हा संसर्गजन्य रोग दिवसेंदिवस पसरत असल्याने विद्यार्थी व पालकांची चिंता वाढली आहे. दरम्यान, यासंदर्भात प्राथमिक आरोग्य केंद्र चे आरोग्य अधिकारी आणि कमर्चारी याप्रकाराकडे गांभीर्याने घेत नसुन दुर्लक्ष होत आहे. मागील काही दिवसांपासून पाटस गावठाण व परिसरातील जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांमध्ये गाल फुगीचा आजार आढळून आला आहे. सुरुवातीला एक दोन विद्यार्थ्यांना येणारी गालफुगी काही दिवसातच विद्यार्थी़ची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. शिक्षकांनी या पालकांना असे विद्यार्थी शाळेत न पाठवता घरी ठेवून योग्य ते उपचार करण्यासाचा सल्ला दिला आहे. मात्र गाल फुगी होत असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ही वाढत चालली असून शिक्षकांची डोकेदुखी वाढली आहे. हा रोग संसर्गजन्य असल्याने तो रोग एकमेकांच्या संपर्कात आल्यावर पसरत असल्याचे निदर्शनास आले आहे.अशी माहिती शिक्षक देत आहेत. आरोग्य विभागाने या प्रकाराकडे गांभीर्याने घेऊन हा रोग आटोक्यात आणण्यासाठी तातडीने शाळांना भेट देऊन योग्य तो औषध उपचार करावेत अशी मागणी शिक्षक व पालक करीत आहेत. दरम्यान, या संदर्भात दौंड तालुका आरोग्य अधिकारी डॉ उज्वला जाधव यांच्याशी संपर्क साधला असता, त्या म्हणाल्या की , तालुक्यातील प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना शाळांना भेट देऊन सर्व्हे करुन योग्य तो औषध उपचार करावेत असा सुचना दिल्या जातील.

# यूजीसी-नेट परीक्षेचा निकाल लांबणीवर

**पुणे :** राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणातर्फे (एनटीए) घेण्यात आलेल्या राष्ट्रीय पात्रता परीक्षेचा (यूजीसी-नेट) लांबणीवर टाकण्यात आला आहे. आता निकाल १७ जानेवारी रोजी जाहीर केला जाणार आहे.

एनटीएने परिपत्रकाद्वारे या बाबतची माहिती दिली. एनटीएतर्फे देशभरातील २९२ शहरांमध्ये ६ ते १९ डिसेंबर या कालावधीत नेट परीक्षा घेण्यात आली. ९ लाख ४५ हजार ९१८ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. या परीक्षेचा निकाल १० जानेवारी रोजी जाहीर करण्यात येणार असल्याचे एनटीएने घोषित केले होते. मात्र मिचौंग वादळामुळे चेन्नई, आंध्र प्रदेशातील उमेदवारांना विद्यार्थ्यांना परीक्षा देता आली नव्हती. त्यामुळे या विद्यार्थ्यांसाठी फेरपरीक्षा आयोजित करण्यात आली. त्यामुळे पूर्वीच्या नियोजनानुसार १० जानेवारीऐवजी १७ जानेवारीला निकाल जाहीर करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. अधिक माहिती https://ugcnet.nta.ac.in/ या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

# पाणी व स्वच्छता या आयामांना समाजात नेण्यासाठी समाजसेवी संस्थाचा पुढाकार कौतुकास्पद - आनंद शेखर

**पुणे :** पाणी व स्वच्छता या आयामाना समाजाच्या सर्व स्तरात नेण्यासाठी समाजसेवी संस्थानी सरकारला केलेले सहकार्य व पुढाकार कौतुकास्पद असून या सामाजीक सहयोगाने सवर्दूर गोदरीमुक्त व पेयजल व्यवस्था भविष्यातही उत्कृष्टपणे कार्यान्वयीत होईल, असा विश्वास नीती आयोगाचे अतिरिक्त अभियान संचालक आनंद शेखर यांनी केले. ते सेंटर फॉर यूथ डेवलपमेंट अँड ॲक्टिव्हिटी संस्थेच्या २५ व्या रौप्य महोत्सव वर्धापननिमित्त आयोजीत ह्णहअरल्ल रवटटक्क्ळळह्ण उपक्रमाच्या कार्यक्रमात बोलत होते.

गेली २५ वर्षे सीवायडीए संस्था युवक विकास, उपजीविका, कौशल्य विकास, कला आणि संस्कृती, शिक्षण, ग्रामीण विकास, पाणी, आरोग्य, स्वच्छता इत्यादि क्षेत्रात कार्यरत आहे, संस्थेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त विविध समाजपयोगी कार्यक्रमांचे आयोजन दि. १० जानेवारी ते १३ जानेवारी दरम्यान करण्यात आले आहे.

या शृंखलेत पुण्यातील अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक सभागृह, यशवंतनगर, येरवडा येथे संपूर्ण दिवस संपन्न झालेल्या पाणी, आरोग्य, स्वच्छता-वॉश या शिखर परिषदेत मुख्य अतिथी म्हणून नीती आयोगाचे अभियान संचालक आनंद शेखर, वॉटरएड इंडियाचे मुख्य कार्यकारी व्ही.के.माधवन, वॉशविशेषतज्ञ महेश मिश्रा यांची उपस्थिती लाभली होती.

यावेळी पुढे बोलताना आनंद शेखर म्हणाले की, गेल्या काही वर्षात केलेल्या विशेष प्रयासानंतरही समाजातील काही घटक आजही शौचालय व पाणीव्यवस्थेपासून वंचित असल्यास त्यांनी या व्यवस्थेचा लाभ घेण्यासाठी स्थानीक प्रशासनाकडे अर्ज करावा अथवा थेट जलशक्ती मंत्रालयातही वेबसाईटच्या माध्यमाने संपर्क करू शकतात, असेही त्यांनी सांगितले.

**व्ही. के. माधवन**

पाणी- आरोग्य आणि स्वच्छता या क्षेत्रातील आव्हाने या विषयी बोलताना वॉटरएड इंडियाचे मुख्य कार्यकारी श्री व्ही के माधवन यांनी सामाजीक संरचनेत ध्येयपूती नंतरही येणारे आव्हाने सांगीतली. त्याचप्रमाणे या विषयातील सातत्य, समाजातील व्यवहार परिवर्तन आणि निरंतरता याबाबत प्रश्न उपस्थित केले, तसेच यात समाज, संघटना आणि स्थानिक सहभाग याने उपाययोजना करण्याचा सल्लाही दिला.

**महेश मिश्रा**

वॉश शिखर परिषदेच्या पहील्या सत्राच्या समारोप करताना वॉश विषयतज्ञ महेश मिश्रा यांनी अत्यंत महत्वाच्या मुद्दयाला हात घालताना वातावरणीय बदलामुळे नष्ट होणाऱ्या नैसर्गिक संसाधनाबाबत काळजी व्यक्त करीत ही साधन संपत्ती संवर्धित व्हावी तसेच नव्या निर्माण स्त्रोतांचा शोध घ्यावा व त्यासाठी विशेष प्रयास करावे, असे आवाहन केले.

शिखर परिषदेच्या विविध सत्रात ह्णवॉश शाश्वतता, वॉशमधील नवीन तंत्रज्ञान आणि वॉशमधील अत्याधुनिक शोध आणि नवकल्पनाह्ण यावर चर्चा करण्यात आली. सत्राच्या अध्यक्षपदी वॉश विषयतज्ञ महेश मिश्रा, प्लॅन इंडियाचे कार्यकारी संचालक मोहम्मद आसिफ, सेव द चिल्ड्रेनचे कार्यक्रम संचालक संजय शर्मा मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. तसेच शिखर परिषदेत ह्णवॉश शाश्वतता, वॉशमधील नवीन तंत्रज्ञान आणि वॉशमधील अत्याधुनिक शोध आणि नवकल्पनाह्ण या विषयांवर उद्बोधन करण्यात आले. यात विषयतज्ञ इकोसन सर्व्हिस फाऊंडेशनचे संचालक डॉ. दयानंद पानसे, ॲटलस कॉप्को इंडिया लि., चे सीएसआर व्यवस्थापक अभिजित पाटील, वॉश मित्रा छत्तीसगडच्या कु. राधा धिवर, युनिसेफचे वॉश ऑफिसर, आनंद घोडके, आयआयटी मुंबई चे गौरव कापसे, साटोचे सौरभ पंड्या, फिनिशचे कार्यकारी व्यवस्थापक अभिषेक चौधरी, सेहगल फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी आधिकारी ललित शर्मा, महापेकोनेटच्या करोन शैवा, जागतिक हवामान उपक्रम युनिसेफचे कार्यक्रम विशेषज्ञ श्री युसूफ कबीर आणि युथएड फाऊंडेशनच्या सीओओ ज्योत्स्ना बहिरट उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतते साठी एम, एन, सणीयाल, निटेश सिंगरुळ, शहाजी गडहीरे आणि प्रिया कोठारी यांनी तसेच संस्थेच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम केले.

# अहिंसा पुरस्काराने म्हमाणे सन्मानित



**म्हसवड :** सहकार क्षेत्रात अव्वलस्थानी असलेल्या येथील अहिंसा नागरी पतसंस्थेने सामाजिक क्षेत्रातही आपले मोठे योगदान दिले आहे, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग कार्य करणार्या व्यक्तींचा या पतसंस्थेने नेहमीच पुरस्कार देवुन गौरव केला असुन यंदाही हिंदी दिनानिमीत्त म्हसवड येथील सिध्दनाथ विद्यालयातील आदर्श शिक्षक अशी प्रतिमा असलेल्या शशीकांत म्हमाणे यांना अहिंसा पुरस्कार देवुन गौरवण्यात आले.

10 जानेवारी हा दिवस विश्व हिंदी दिन म्हणुन साजरा करण्यात येतो. त्या दिवशीच हिंदी विभागात विशेष योगदान असणारे शिक्षक शशिकांत म्हमाने यांना सातारा जिल्हा शिक्षक बँकेचे व्हा. चेअरमन विजयराव बनसोडे यांच्या हस्ते देऊन सन्मानित करून विश्व हिंदी दिनआगळा वेगळा स्वरूपात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख मान्यवर जिल्हा बँकेचे व्हा. चेअरमन विजयराव बनसोडे, पुरस्कार प्राप्त शिक्षक शशिकांत म्हमाने, संस्थेचे चेअरमन व माजी नगराध्यक्ष नितिन दोशी, सिद्धनाथ हायस्कूलचे व जुनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रविण दासरे, विठ्ठल सजगाने, संतोष देशमुख उपस्थित होते.

**सर्व मान्यवरांचे स्वागत**

म्हमाने यांना शाल, सन्मानचिन्ह, रोख रक्कम व भेटवस्तू देऊन जिल्हा शिक्षक बँकेचे व्हा. चेअरमन विजयराव बनसोडे यांचे हस्ते अहिंसा आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी संतोष देशमुख म्हणाले म्हमाने म्हमाणे हे उपक्रमशील शिक्षक असून हिंदी विषयात त्यांनी विविध विद्यार्थ्यांना नेहमी प्रेरणा दिली आहे. आर्थिक दृष्ट्या कमकुवत असणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचा मदतीचा हात असतो. विठ्ठल सजगाने आपल्या मनोगतात म्हणाले की समाजातील चांगल्या कामाचा अहिंसा पतसंस्थेकडून नेहमीच गौरव करण्यात येतो. म्हमाने यांचे हिंदी विषयातील योगदान व विद्यार्थ्यां प्रती असणारी धडपड पाहून अहिंसा पुरस्काराने ते आज सन्मानित झाले आहेत. आजच्या पुरस्काराने शैक्षणिक कार्यात जोमाने काम करण्यास निश्चितच प्रेरणा मिळणार आहे. शिक्षक हा भावी पिढी घडवत असतो. त्यामुळे शिक्षकांनी फार जबाबदारीने वागले पाहिजे आपण कसे वागतो हे समाज व विद्यार्थी पाहत असतात. त्यामुळे शिक्षकांवर खूप मोठी जबाबदारी आहे.

सिद्धनाथ हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य दासरे म्हणाले शशिकांत म्हमाने यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन अहिंसा पतसंस्थेने आमच्या सिद्धनाथ हायस्कूलचा सन्मान केला आहे. म्हमाने सर हे विद्यार्थी प्रिय शिक्षक असून त्यांचे नेहमी नाविन्य पूर्व उपक्रम सुरू असतात. हिंदी विषयाच्या अध्यापकाचा हिंदी दिना दिवशी अहिंसा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळत आहे हा अतिशय चांगला योगायोग आहे.

अहिंसा पतसंस्थेचे चेअरमन व माजी नगराध्यक्ष नितिन दोशी म्हणाले की अहिंसा पतसंस्थेच्या संचालक मंडळांनी म्हमाने सरांचे शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य पाहून त्यांनाअहिंसा आदर्श शिक्षक पुरस्कार देण्याचा निर्णय घेतला. म्हमाने हे विद्यार्थी व आपली शाळा यास केंद्रबिंदू मानून काम करणारे शिक्षक आहे. जिल्हा हिंदी अध्यापक मंडळावर ते कार्यरत आहेत .सिद्धनाथ हायस्कूल मध्ये हिंदी राष्ट्रभाषा परीक्षेस दरवषी उच्चांकी विद्याथी बसवण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. विश्व हिंदी दिनानिमित्त एका हिंदी विषय शिकवणाऱ्या शिक्षकास हा पुरस्कार देताना खूप आनंद होत आहे.

सातारा जिल्हा शिक्षक बँकेचे व्हा. चेअरमन विजयराव बनसोडे यावेळी म्हणालेअहिंसा पतसंस्था नेहमीच गुणवंतांच्या कौतुकासाठी उभी असते म्हमाने सरांच्या आदर्श शिक्षक म्हणून पुरस्कार देताना मलाही शिक्षक म्हणून अभिमान आहे. त्यांच्याकडून यापुढेही असेच कार्य घडत राहो यासाठी जिल्हा शिक्षक बँकेच्या वतीने शुभेच्छा देत आहे. भविष्यात त्यांच्या कार्याची दखल घेऊन राज्य व केंद्र सरकारकडून ही यथोचित पुरस्कार मिळावेत अशी यावेळी बनसोडे यांनी अपेक्षा व्यक्त केली.

अहिंसा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक शशिकांत म्हमाने सर आपल्या मनोगतात म्हणाले अहिंसा पतसंस्थेने पुरस्कारासाठी निवड करून सत्कार केला तो माझ्या जीवनातील सुवर्ण क्षण असून या पुरस्काराने मी कृतार्थ झालो आहे. एक हिंदी शिकवणाऱ्या शिक्षकाला विश्व हिंदी दिना निमित्त आदर्श शिक्षक पुरस्कार मिळत असल्याने माझ्या शैक्षणिक क्षेत्रात विशेषतः हिंदी विभागात कार्य करण्यास प्रेरणा मिळणार आहे. शिक्षण क्षेत्रात कार्य करण्यास या पुरस्काराने ऊर्जा मिळाली जे जे चांगले विद्यार्थ्यांसाठी करता येईल ते ते मी करण्यास भावी काळात कटिबद्ध राहणार आहे.

यावेळी संस्थेचे संचालक महावीर होरा, विजय बनगर, बाळासाहेब सरतापे, व्यवस्थापक दीपक मासाळ, अजित गांधी राणी डोंगरे यांचे सह अहिंसा परिवारातील सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते. सूत्र संचालन श्री अक्षय धट यांनी केले आभार निरज व्होरा यांनी मानले.

# भारत-चीन सीमेवर कोणत्याही परिस्थितीचा सामना करण्यास सैन्य सज्ज

## वार्षिक पत्रकार परिषदेत लष्कर प्रमुख जनरल मनोज पांडे यांची ग्वाही

**नवी दिल्ली :** भारत आणि चीन दरम्यानच्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर अद्याप तणावाची परिस्थिती कायम आहे. मात्र, या सीमारेषेवर कोणत्याही आव्हानाला तोंड देण्यासाठी भारतीय लष्कर पूर्णपणे सज्ज आहे, अशी काही लष्कर प्रमुख जनरल मनोज पांडे यांनी वार्षिक पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

भारत आणि चीन दरम्यानची सीमारेषा अद्याप अतिसंवेदनशीलच आहे. या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर भारतीय सैन्याने आपल्या सामर्थ्यात लक्षणीय वाढ करून कोणत्याही प्रसंगाला सामोरे जाण्याची जय्यत तयारी ठेवली आहे, असे जनरल पांडे यांनी स्पष्ट केले.

पाकिस्तानकडून दहशतवाद्यांना मिळणारा मदतीचा ओघ अद्यापही सुरूच आहे. मात्र, काश्मीरमधील अंतर्गत हिंसाचारात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. दहशतवाद्यांकडून घुसखोरीचे प्रयत्न अद्यापही सुरूच आहेत. विशेषतः पूंछ, राजौरी विभागात दहशतवाद्यांच्या हालचाली अधिक प्रमाणात आहेत. तरीही आकडेवारीचा विचार करता या विभागात अनेक दहशतवाद्यांना सुरक्षा दलाने कंठस्नान घातले आहे. घुसखोरीला आळा घालण्यात सुरक्षा दलांना मोठे यश मिळाले आहे, असे जनरल पांडे म्हणाले.

चीन एकीकडे भूतान बरोबर सीमा प्रश्न सोडविण्यासाठी चर्चा करीत असतानाच दुसरीकडे भूतानच्या भूप्रदेशात अतिक्रमण करीत आहे. या घडामोडींबाबत बोलताना जनरल पांडे म्हणाले की, भूतान आणि चीन यांच्या सीमेवर घडणाऱ्या घटनांचा प्रभाव भारतावर पडणे स्वाभाविक आहे. भूतान आणि भारत यांच्यामध्ये परस्पर विश्वासाचे आणि सौहार्दाचे संबंध दीर्घ काळापासून चालत आले आहेत. अर्थातच, परस्परांच्या संरक्षण विषयक माहितीची देवाणघेवाण या दोन देशांमध्ये सातत्याने होत असते. म्यानमारच्या सीमा भागातून काही दहशतवादी गट मणिपूरमध्ये शिरकाव करण्याच्या प्रयत्नात असतात. सुरक्षा दलांचे त्यांच्यावर बारकाईने लक्ष आहे, असेही ते म्हणाले.

# आमदार अपात्रता प्रकरणी भाजप नेत्यांच्या दबावाखाली निर्णय

## संविधान टिकणार की नाही हाच प्रश्न असल्याचे रोहित पवार यांचे मत

**पुणे :** शिवसेनेचे आमदार अपात्रता प्रकरणी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलेला निर्णय भारतीय जनता पक्षाच्या मोठ्या नेत्यांच्या दबावाखाली द्यावा लागला आहे. अध्यक्षांना भाजप नेत्यांचे ऐकणे भाग पडले, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी व्यक्त केली आहे. मात्र, हा निर्णय सर्वोच्च न्यायालयात टिकणार नाही, असे मतही त्यांनी व्यक्त केले. सध्याच्या परिस्थितीत संविधान टिकणार की नाही, हा प्रश्न उपस्थित होत असल्याचेही ते म्हणाले.

आमदार अपात्रता प्रकरणी अध्यक्षांनी भाजप नेत्यांच्या दबावाखाली येऊन निर्णय दिला आहे. मात्र, हा निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या सूचनांचे उल्लंघन करून देण्यात आला आहे. त्यामुळे हा निर्णय न्यायालयात टिकणार नाही, असा विश्वास पवार यांनी व्यक्त केला. सध्याच्या काळात घडत असलेल्या अशा घडामोडी पाहून यापुढे संविधान टिकणार की नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे असेही ते म्हणाले.




वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या ४७ व्या सवर्साधारण सभेला उपस्थित राहण्यासाठी रोहित पवार येथे आले आहेत. या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार एकत्र येण्याची शक्यता होती. मात्र, अजित पवार यांनी या कार्यक्रमाला येण्याचे टाळले. याबाबत बोलताना रोहित पवार म्हणाले की, कदाचित अजितदादांना अधिक महत्त्वाचे काम असावे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापेक्षा अजितदादा कदाचित अधिक कार्यक्षम असावे त्यामुळे त्यांना वेळ नसावा, अशा शब्दात रोहित पवार यांनी अजित पवार यांची खिल्ली उडवली.

# प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केली उद्धव ठाकरे यांना सहानुभूती

## अशा प्रवृत्तींविरोधात एकत्र येऊन लढण्याचे केले आवाहन

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून राज्यातल्या जनतेला आमदारांच्या अपात्रतेच्या निकालाची उत्सुकता लागली होती. आज राहुल नार्वेकरांनी अखेर शिंदेंच्या शिवसेनेच्या बाजूने निकाल दिला. यावर वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी ट्विटरच्या माध्यमातून प्रतिक्रीया देत म्हटले आहे की, राहुल नार्वेकरांनी जो निकाल दिला, त्याच्यामुळे युतीमधील आमचे मित्रपक्ष उध्दव ठाकरे यांना धक्का बसला आहे. अपेक्षा होती की खरा निकाल लागेल मात्र, खरा निकाल लागला नाही. उद्धव ठाकरे यांच्याप्रती



आम्ही सहानुभूती व्यक्त करतो.

ज्या दिवशी निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांच्या गटाला अधिकृत नाव आणि चिन्ह कायम ठेवण्याची परवानगी दिली, त्याच दिवशी शिवसेना ठाकरे गटाची हार झाली होती. आज फक्त औपचारिकता बाकी होती. आम्हाला उध्दव ठाकरे यांच्याबद्दल सहानुभूती आहे, असे त्यांनी म्हटले आहे. निकाल काहीही लागला असला, तरी ह्या प्रवृत्तीविषयी आपण मिळुन लढू असं देखील त्यांनी उद्धव ठाकरे यांना आव्हान केले आहे.

खरी शिवसेना कुणाची हे ठरवण्याचा अधिकार मलाच आहे, असं आज विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले. शिवसेनेची ही घटनाच हे सांगत आहे की, त्यात कशी पद रचना आहे. त्यानुसारच खरी शिवसेना कुणाची आहे? याचा निर्णय घेतला आहे. २१ जून २०२२ ला शिवसेनेत दोन गट पडले. सगळे पुरावे, साक्षी यांचा विचार करता मी शिंदे गटाची शिवसेना हीच खरी शिवसेना आहे, ही मान्यता देतो असं राहुल नार्वेकर यांनी म्हटलं आहे.

# ... तरीही मुख्यमंत्री निकालाबाबत असमाधानीच

## अध्यक्षांवर कोणता दबाव होता याची केली विचारणा

**मुंबई :** राज्यातील सत्तासंघर्षानंतर शिवसेनेच्या दोन्ही गटांनी एकमेकांवर ठोकलेल्या आमदार अपात्रतेच्या दाव्यांचा निकाल देताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केवळ शिंदे गटाच्या नव्हे तर महायुती सरकारच्या डोक्यावरील टांगती तलवार दूर केली आहे. तरीही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या निकालाबाबत पूर्ण समाधानी नाहीत. एवढेच नव्हे तर हा निकाल देताना अध्यक्षांवर कोणता दबाव होता, असा सवालही त्यांनी केला आहे. आमदार अपात्रते प्रकरणी निकाल देताना शिवसेना पक्ष अध्यक्षांनी शिंदे गटाच्या पारड्यात टाकला. याशिवाय शिंदे गटाच्या एकाही आमदाराला अपात्र ठरविता येणार नाही, असा निकाल देऊन मोठा दिलासाही दिला. मात्र, ठाकरे गटाचे आमदार अपात्र का ठरले नाहीत, असा सवाल करत मुख्यमंत्री शिंदे यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या प्रतिक्रियेत आपली नाराजी व्यक्त केली. हा निर्णय घेताना अध्यक्षांवर



कोणाचा दबाव होता, असा सवालही त्यांनी केला.

दुसरीकडे अर्थातच, ठाकरे गट अध्यक्षांच्या निणर्यावर पूर्णपणे नाराज आहे. वरून लादलेला निर्णय, लोकशाहीची पायमल्ली, निर्लज्जपणाचा कळस अशा शेलक्या शब्दांनी ठाकरे गटाकडून या निकालावर टीका करण्यात येत आहे. ठाकरे गट या निकालाबाबत सर्वोच्च न्यायालयात धाव घेणार असून तिथे हा निर्णय टिकणार नाही. आम्हाला योग्य न्याय मिळेल, असा विश्वास उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला आहे.

विधानसभा अध्यक्षांचा हा निकाल अपेक्षितच होता. मात्र, हा निकाल ही आमच्यासाठी एक संधी आहे, अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष आणि महाविकास आघाडीचे शिल्पकार शरद पवार यांनी या निकालावर प्रतिक्रिया दिली आहे. ठाकरे गटाला सर्वोच्च न्यायालयाकडून न्याय मिळेलच. मात्र, हा निर्णय राज्यातील जनतेला मान्य नाही. त्यामुळे आगामी लोकसभा, विधानसभा निवडणुकीत जनता मतदानाद्वारे योग्य न्याय करेल, असे पवार म्हणाले.


# सोमेश्वरवाडी ते बाणेर, पदपथाची कामे कधी होणार









**बाणेर, बालेवाडी / रमेश जयस्वाल**

स्मार्ट सिटी म्हणून गाजावाजा करण्याचा प्रकार प्रत्यक्षात अनेक कामे पदपथाची खोदून पडली आहे तर काही ठिकाणी नियमानूसार कामे सूरू नसल्या कारणाने हे कामे कशी आणि कोणत्या प्रकारे टिकणार हा जनतेत प्रश्न पडत आहे.

बाणेर, बालेवाडीतील अनेक पदपथ या ना कारणाने खोदून पडलेले आहे यात मेट्रोची कामे सूरू आहे रस्ता अरूंद यामूळे वाहनचालक आणि जाणारे आणि येणारे जनतेला नाहक त्रास सहन करावा लागत आहे महानगरपालीका ऐकीकडे पदपथ दिन साजरा करते आणि दूसरी कडे या विभागात अनेक पदपथ खोदून पडले आहे ड्टस्मार्टसिटी म्हणून बाणेर, बालेवाडीचा गाजावाजा करणारे मूग गिळून बघ्याची भूमीका का घेत आहे पाईप लाईन, पदपथाचे विस्तारिकरण, ईलेक्ट्रीक केबल,ईतर कंपण्याचे केबल टाकण्याच्या नावावर वारंवार जागो खोदकाम सूरू आहेड्टयात सर्व सामान्य जनता भरडली जात आहेड्ट कामे बंद आहे असे मनपा कडून वारंवार सांगितले जात असला तरी येथिल परिस्थिती फार वेगळी दिसत आहे. या खोदकामामुळे जनतेला आणि स्थानिक रहिवाशांना फार त्रास सहन करावा लागत आहे ड्टवेळोवळी खोदकाम परत परत त्याच ठिकाणी कशा प्रकारे होते आणि माजी नगरसेवक गप्प का आहे याबाबत जनतेत प्रश्न पडत आहेड्ट बाणेर विभागात अनेक ठिकाणी पदपथाची कामे सुरू आहे हे कामे शासकिय नियमानूसार होत नसल्याचे दिसते योग्यरित्या सिमेंटचा वापर न करता मातीवरच पदपथाचे साईडचे गट्टे उभे करण्याचा प्रकार सुरू असल्याचे दिसत आहे हे केलेली कामे किती दिवस टिकेल हा जनतेला प्रश्न पडला आहे पदपथाची कामे नियमानूसार होत नसतील तर यावर अंकूश कोण ठेवणार? गेल्या दोन वर्षा पासून पाषाण ते बाणेर रस्त्याची कामे जागो जागी खोदून पडली आहे अनेक ठिकाणी माती,दगड,सिमेंटचे गट्टे आणि ईतर साहित्य रस्त्यावर पडली आहे एक तर मेट्रोची कामे सूरू आहे रस्ता अरूध्द वाहनचालकांना चालवतांना कसरतीचा सामना करावा लागतो तर पायी चालणारे रस्ता शोधत मार्ग काढतांना दिसतातड्टदोन दोन किलोमिटर रस्ता जागोजागी खोदून ठेवण्याचा प्रकार केला जात आहे ड्टखोदकामा बाबत जयेश मुरकूटे यांनी याबाबत मनपाला पत्र देऊन जनतेला होणारा त्रासा बाबत आवाज उठविला होता. एक तर पदपथाची कामे हे स्थानिक पूढारी यांचे चेलेचपाटे करत असल्याची जनतेत चर्चा आहेड्ट होणारे कामे शासकिय नियमानूसार होत नाही, नियमा विरोधात जागोजागी रस्ते खोदून पडले आहे यात मनपाचे कोणत्याही प्रकारे नियंत्रण नसल्या कारणाने वाहनचालक आणि स्थानिक रहिवाशी तसेच पायी चालणारी जनता याचा विचार न करता ही कामे सुरू आहे ड्टस्मार्ट सिटीच्या नावावर जनतेला होणारा त्रास थांबविण्याची मागणी येथिल जनते कडून होत आहे